**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ**
**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University**
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
©: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation**

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 2462
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक: 26 OCT 2023
Date:

**परिपत्रक क्रं.- 65 /२०२३**

परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि.१७/१०/२०२३ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.०५ खालील प्रमाणे ठराव पारित झालेला आहे.

**सर्व विद्याशाखांतर्गत सर्व अभ्यासक्रमांसाठी Democracy, Election and Good Governance आणि Environmental Studies थेअरी (५० गुण ) विषयाची परीक्षा ही संपूर्णतः महाविद्यालयीन स्तरावर आयोजित करुन त्याचे गुण विद्यापीठास सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

वरीलप्रमाणे पारित झालेल्या ठरावानुसार सर्व संलग्नित महाविद्यालयातील मा.प्राचार्य/संचालक व विद्यापीठ संकुलाचे संचालक यांना या परिपत्रकाद्वारे आदेशान्वये कळविण्यात येते की, **शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून सर्व विद्याशाखांतर्गत सर्व अभ्यासक्रमासाठी Democracy, Election and Good Governance आणि Environmental Studies या विषयाची परीक्षा संबंधित महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर (प्रश्नपत्रिका व वेळापत्रक तयार करणे आणि उत्तरपत्रिकाचे मूल्यमापन करुन गुण विद्यापीठाकडे सादर करणे इ. सर्व बाबी) आयोजित करुन त्याचे गुण विद्यापीठास सादर करावे. सदर विषयाचे गुण विद्यापीठ परीक्षा सुरु होणेपूर्वी महाविद्यालयाच्या लॉगीन मधून ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठास सादर करणे आवश्यक आहे. सदरच्या गुणांची मूळ प्रत महाविद्यालयाने अध्यादेशामध्ये नमूद कालावधीपर्यत महाविद्यालय स्तरावर जतन करावी.**

सदरचा बदल हा सर्व संलग्नित महाविद्यालये, विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावे. परिपत्रकात नमूद केलेल्या सर्व बाबीची अत्यंत काटेकोरपणे नोंद घेऊन त्यानुसार योग्य ती कार्यवाही करुन परीक्षेच्या कामात विद्यापीठास सहकार्य करावे.

**प्र. संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**सोबत-वरीलप्रमाणे**

जावक क्रं. : पुअहोसोविसो/परीक्षा व मूल्यमापन /वेळापत्रक/२०२३/ 2462
दिनांक : 26 OCT 2023

**प्रत- माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीस्तव**

(०१) संगणक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ - यांना परिपत्रकाची एक प्रत देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रकानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.
(०२) मा.प्राचार्य, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
(०३) मा. संचालक, प्रस्तुत विद्यापीठ.
(०४) पेपर सेटिंग विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
(०५) गोपनिय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
(०६) परीक्षा कालीन विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.